महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,**
**PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005**

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /
25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

जा.क्र पुविमं / शाखा उमा अ / 8702
पुणे–411005
दिनांक : 07 / 11 / 2025.

प्रति,
प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविदयालये,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) फेब्रु–मार्च, 2026 परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या तारखाबाबत तसेच प्रिलिस्ट व चलन स्विकारण्याच्या दिनांकाबाबत..**

**संदर्भ : राज्य मंडळाचे क.रा.मं / परीक्षा–3 / 3766, दिनांक–03 / 11 / 2025 चे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालयांना कळविण्यात येते की,

1. संदर्भीय पत्रानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) **फेब्रु–मार्च, 2026** परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या विलंब शुल्काबाबतच्या तारखा व सोबतच्या पत्रान्वये कळविण्यात येत आहेत तसेच पत्रातील मुद्दा क्र. 1 ते 8 नुसार योग्य ती कार्यवाही करावी.
2. तसेच नियमित व विलंब शुल्काने भरलेल्या आवेदनपत्रांच्या प्रिलिस्ट व RTGS/NEFT पावती / चलन विभागीय मंडळाकडे जमा करावयाच्या आहेत. सदरचे साहित्य खालीलप्रमाणे नमूद संकलन केंद्रांवर **बुधवार दिनांक 12 नोव्हेंबर, 2025** रोजी **सकाळी 11:00 ते दुपारी 03:00** वाजेपर्यंत मंडळाच्या प्रतिनिधींकडून स्विकारण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | संकलन / वाटप केंद्राचे नाव | अंतर्भुत तालुके व तालुका | ज्यु. कॉलेज इंडेक्स |
|---|---|---|---|
| 1. | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005 (11.05, 11, 12, 15) | पुणे शहर– पुर्व | J 11.11 |
| | | हवेली | J 11.05 |
| | | पुणे शहर–पश्चिम | J 11.15 |
| | | पुरंदर | J 11.12 |
| 2. | जयहिंद हायस्कूल, पिंपरी, जि.पुणे. (11.09, 10, 16) | पिंपरी चिंचवड | J 11.16 |
| | | मावळ | J 11.09 |
| | | मुळशी | J 11.10 |
| 3. | राजा रघुनाथराव विद्यालय, भोर, पुणे,(11.03, 14) | भोर | J 11.03 |
| | | वेल्हा | J 11.14 |
| 4. | एम.ई.एस. हायस्कूल, रेल्वे स्टेशन जवळ, ता.बारामती, जि. पुणे (11.02, 04, 06) | बारामती | J 11.02 |
| | | दौंड | J 11.04 |
| | | इंदापूर | J 11.06 |
| 5. | गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिर, नारायणगांव, जि.पुणे (11.01, 07) | आंबेगाव | J 11.01 |
| | | जुन्नर | J 11.07 |
| 6. | श्री. भैरवनाथ विदयामंदिर, पाबळ, ता.शिरुर जि.पुणे (11.08, 13) | खेड | J 11.08 |
| | | शिरुर | J 11.13 |
| 7. | भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री विद्यालय, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर | संगमनेर | J 12.11 |
| | | अकोले | J 12.01 |

| अ.क. | वाटप केंद्राचे नाव | अंतर्भुत तालुके व तालुका | ज्यु. कॉलेज इंडेक्स |
|---|---|---|---|
| 8. | महात्मा गांधी विद्यालय, कर्जत जि. अहिल्यानगर (12.02, 03, 13) | कर्जत | J 12.03 |
| | | जामखेड | J 12.02 |
| | | श्रीगोंदा | J 12.13 |
| 9. | ए.ई.सो. चे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहिल्यानगर (12.05, 07, 08, 12) | अहिल्यानगर शहर | J 12.05 |
| | | पारनेर | J 12.07 |
| | | पाथर्डी | J 12.08 |
| | | शेवगाव | J 12.12 |
| 10. | के. जे. सोमय्या हायस्कूल, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (12.04, 06, 09, 10, 14) | श्रीरामपूर | J 12.14 |
| | | कोपरगाव | J 12.04 |
| | | राहूरी | J 12.10 |
| | | नेवासा | J 12.06 |
| | | राहाता | J 12.09 |
| 11. | छत्रपती शिवाजी प्रशाला, मुरारजीपेठ, जि.सोलापूर (24.01, 07, 09) | सोलापूर शहर | J 24.09 |
| | | अक्कलकोट | J 24.01 |
| | | मोहोळ | J 24.07 |
| 12. | सुलाखे हायस्कूल, बाळेश्वर मंदिराजवळ, बार्शी, जि.सोलापूर (24.02, 03,04) | बार्शी | J 24.02 |
| | | माढा | J 24.04 |
| | | करमाळा | J 24.03 |
| 13. | कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, मु.पो.ता. पंढरपूर, जि.सोलापूर | पंढरपूर | J 24.08 |
| | | मंगळवेढा | J 24.06 |
| | | माळशिरस | J 24.05 |
| | | सांगोला | J 24.10 |

3. तसेच सदर दिनांकास उपरोक्त वाटप केंद्रांवर **इ. 12 वी जुलै, 2025 पुरवणी परीक्षेचे प्रमाणपत्र** वाटप करण्यात येणार आहे त्यानुसार संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या प्रतिनिधीकडे प्रमाणपत्र मागणीचे पत्र देवून सादरचे साहित्य स्विकारावे.

उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबधित कनिष्ठ महाविदयालयांनी आपल्या प्रतिनिधिना शिफारस पत्रासह तालुकानिहाय निश्चित केलेल्या वाटप केंद्रावर वेळेत हजर राहून आपले प्रिलिस्ट व RTGS/NEFT पावती/चलन जमा करावे व तसेच प्रमाणपत्र स्विकारण्याचे आहेत, याची नोंद घ्यावी..

## महत्वाची सूचना :-

1. **प्रिलिस्ट मधील दुरुस्ती लाल पेनानी दर्शवून स्वतंत्र जमा करावयाची आहे.**
2. **RTGS/NEFT ची पावती/चलन हे स्वतंत्र पाकिटात जमा करावयाचे आहे.**

MBRaut

(डॉ.मीनाक्षी राऊत)
प्र. विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005

प्रत माहितीस्तव:–
मा.सचिव राज्यमंडळ,पुणे.

| Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४. | |
|---|---|---|---|

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे/तातडीचे

क. रा.मं/परीक्षा–३/ ३७६६
पुणे – ४११००४
दिनांक –०३/११/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु–मार्च २०२६ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या तारखांबाबत.**

**संदर्भ– १. क.रा.मं./ले–पे०६/परीक्षा शुल्क २०२५–२६/१४५३, दि.२४/०४/२०२५ रोजीचे पत्र.**
**२ क.रा.मं/परीक्षा–३/३०६९ दि.०४/०९/२०२५ रोजीचे पत्र**
**३ क.रा.मं/परीक्षा–३/३०१४ दि.२९/०९/२०२५ रोजीचे पत्र**
**४ क.रा.मं/परीक्षा–३/३५८८ दि.१७/१०/२०२५ रोजीचे पत्र**

A
६/११/२५

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु–मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे **UDISE +** मधील **PEN-ID** वरून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या विलंब शुल्काच्या तारखांना अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| शुल्क प्रकार | आवेदनपत्र भरावयाच्या तारखा | विलंब शुल्काने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क RTGS/NEFT द्वारे मंडळाकडे भरणा करावयाचा कालावधी | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT ची पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| विलंब शुल्क (मुदतवाढ) | मंगळवार, दि. ०४/११/२०२५ ते सोमवार, दि. १०/११/२०२५ | मंगळवार, दि. ०४/११/२०२५ ते मंगळवार, दि. ११/११/२०२५ | बुधवार दि. १२/११/२०२५ |

सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी College Profile मध्ये कॉलेज, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळाप्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.



BYMAU
1232
04/11/2025

इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहेत–

१ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे **UDISE + मधील PEN-ID** वरुन भरण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. UDISE + मध्ये विद्यार्थ्यांची नोंद नसल्यास संपूर्ण माहिती भरून आवेदनपत्रे सादर करता येईल.

२ पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी), व्यवसाय अभ्यासक्रम शाखेच्या (HSC Vocational) विद्यार्थ्यांची माहिती UDISE + मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने निश्चित केलेल्या तारखांना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.

३ ज्या विद्यार्थ्यांचा APPAR-ID उपलब्ध आहे त्याची नोंद आवेदनपत्र भरताना करण्यात यावी.

४ सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावे. **रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या application status मध्ये " Draft" चा "Send to Board" व Payment status मध्ये "Not Paid" चा "Paid" असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी.** अशा "Send to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

५ उच्च माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना भरलेल्या आवेदनपत्रांमधून निवड करून एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील. परंतु शुल्काचा भरणा करताना प्रत्येक चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरून त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे Status Update होईल.

६ आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करून चलनावरील virtual account मध्ये RTGS/NEFT द्वारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच account number व IFSC code चूकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

७ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

८ विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना पुनःश्च मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

Digitally signed by
Dipak Ambadas Mali
Date: 31-10-2025
15:57:12
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**

१ व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.
२ समन्वयक ऑनलाईन विभाग, राज्यमंडळ, पुणे.
३. अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
४. लेखा शाखा, राज्य मंडळ, पुणे